काायम विनाअनुदान तत्वावर
(माध्यम इंग्रजी)

क्र.१२५८४

जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/०९-१०
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

९५

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,पुणे.

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

खडकी शिक्षण संस्था.
खडकी, पुणे-४११ ००३.
आवक क्र.:- ८
दिनांक :- २४.८.१०

विषय : सन २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी) . . .

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राश १००८/ प्र.क्र.६७९/ प्राशि-३, दिनाक २० ऑगष्ट २००९
२. आपले पत्र क्र.जि.प./शिक्षण/प्राथ/खाप्राशा/९०/२०१० दिनांक १३/४/२०१०

उपरोक्त विषयासंदर्भात आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००९ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | खडकी शिक्षण संस्था,खडकी,पुणे. | इंग्लिश मेडियम स्कूल,खडकी, पुणे. | १ ली | इंग्रजी | जून २००९ पासून |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती. संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित करणे पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ [illegible]

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीक... [illegible] अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे.आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

(पु-हाडे सु.जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.करिता.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
[illegible]

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,---यांना आवश्यक व त्या कार्यवाहीसाठी.
४. अध्यक्ष/सचिव,
   खडकी शिक्षण संस्था,खडकी,पुणे.

K. E. S., Chetan Dattaji Gaikwad ... English ... School
Khadki, Pune-03

(९३)

<u>कायम विना अनुदान तत्त्वावर (इंग्रजी माध्यम)</u>

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा/३७८/२०११**
**पुणे १ दिनांक:-२७/ ०८/२०११**

**प्रति,**

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका**
**खडकी शिक्षण संस्था खडकी, पुणे - ३**

**विषयः-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निणंय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि -३ दि.१४ जानेवारी २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा /वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग जून २०११, पासून सन २०११ -१२ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | खडकी शिक्षण संस्था खडकी पुणे - ३ | इंग्रजी | इ. १ ली<br>इ. २ री<br>इ.३ री<br>इ. ४ थी | २ जादा तुकडया<br>१ नैसर्गिक २ जादा तुकडया<br>१ नैसर्गिक १ जादा तुकडया<br>१ नैसर्गिक तुकडी | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

<u>अटी व शर्ती</u>

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

K. E. S., Chetan Dattaji Gaikwad English Medium School, Khadki, Pune-03

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना
३. सचिव / अध्यक्ष
खडकी शिक्षण संस्था खडकी पुणे - ३

Principal
Khadki Education Soc
Chetan Dattaji Gaikw

कायम विना अनुदान तत्त्वावर
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

(९१)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/८८७/२०१२
पुणे १ दिनांक:- २१/११/२०१२

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
चेतन दत्ताजी गायकवाड इंग्लिश मिडीयम स्कूल, खडकी,
पुणे.

**विषय:-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा / नैसर्गिक [illegible] /वाढीच्या [illegible]/ [illegible] /वर्ग [illegible] परवानगी देणेबा...

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि -३ दि.१४ जानेवारी २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक वाढीचा / अतिरिक्त जादा तुकडया** /वर्ग सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चेतन दत्ताजी गायकवाड इंग्लिश मिडीयम स्कूल, खडकी, पुणे. | इंग्रजी | इयत्ता ३ री<br>इयत्ता ४ थी<br>इयत्ता ५ वी | ३ री तुकडी<br>२ री तुकडी<br>- | जादा तुकडी वाढ<br>जादा तुकडी वाढ<br>नैसर्गिक वाढ | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना
सचिव / अध्यक्ष :- चेतन दत्ताजी गायकवाड इंग्लिश मिडीयम स्कूल, खडकी, पुणे.
मुख्याध्यापक :- चेतन दत्ताजी गायकवाड इंग्लिश मिडीयम स्कूल, खडकी, पुणे.

K. E. S. Chetan Dattaji G... English ...
Khadki, Pune

Principal
Khadki Education Society's

कायम विना अनुदानित तत्त्वावर
(मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/३३६ /२०१६
पुणे १ दिनांक:-२०/०५/२०१६

प्रति,

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**
**चेतन दत्ताजी गायकवाड इंग्लिश मिडीअम स्कूल,**
**खडकी पुणे**

**विषय:-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/**नैसर्गिक वाढीचा**/वाढीच्या प्राथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक वाढीचा** /जादा तुकडया /वर्ग **सन २०१५-२०१६** च्या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | चेतन दत्ताजी गायकवाड इंग्लिश मिडीअम स्कूल, खडकी पुणे | इंग्रजी | इयत्ता ६ वी<br>इयत्ता ७ वी | नैसर्गिक वाढ | कायमविना अनुदानित तत्त्वाव |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शासन निर्णय १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. पीटीआर ११३/(०१/२०१३)/एसएम-४ दिनांक १३/१२/२०१३ २) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५ /टीएनटी.-२ दिनांक २८/०८/२०१५ ३) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१५ /प्र.क्र.१६/१५/टीएनटी.-२, दिनांक ०८/०१/२०१६ अन्वये नमूद केलेनुसार प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निर्धारित करावयाची असल्याने यापुढे नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त वाढीव तुकडी वाढ आदेशाची आवश्यकता नाही.

९. शासन निर्णय क्र. प्राशातु ११११२/(२५८/२०१३) प्राशि ३ दि. २/०७/२०१३ अन्वये ३ कि.मी. परिसरात इ. ८ वीचा इंग्रजी माध्यमाचा वर्ग उपलब्ध असल्याने इ. ८ वीच्या वर्गास मान्यता देण्यात येणार नाही.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

Principal
Khadki Education Society's
Chetan Dattaji Gaikwad

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

३५४

क्रमांक :खाप्राशा- २०१५-१६/८९६१/प्रशा-ड /५१२-अ
प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे- १
दिनांक : २७ जून, २०१६.

01 JUL 2016

प्रति,.
मा.प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,
मुंबई -३२

**विषय:- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये**
**<u>इ. ८ वी चा वर्ग जोडण्याबाबत..</u>**
चेतन दत्ताजी गायकवाड, इंग्लिश मिडीयम स्कूल, खडकी पुणे

संदर्भ:- १.शासन पत्र क्र. आटीई-२०१५/४४/१५एसएम-५, दि.११ मे.२०१५
२.शासन निर्णय क्र.एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५ /टिएनटि-२ दिनांक २८ ऑगष्ट २०१५.

महोदय,

शासन निर्णय क्र.एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५ /टिएनटि-२ दिनांक २८ ऑगष्ट २०१५ शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी दिनांक २०/५/२०१६ चे पत्रान्वये चेतन दत्ताजी गायकवाड, इंग्लिश मिडीयम स्कूल, खडकी पुणे शाळेचा इ.८वी च्या नैसर्गिक वर्गवाढीचा खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

| संस्थेचे /शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | आवश्यक शिक्षक संख्या | वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| खडकी शिक्षण संस्था, पुणे संचलित चेतन दत्ताजी गायकवाड, इंग्लिश मिडीयम स्कूल, खडकी पुणे | इंग्रजी | इ. ८ वी | १. | २०१५-१६ | मुख्य कार्यकारी अधिकारी, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड, यांची शिफारस आहे. |

शासन निर्णय क्र. प्राशोधो २०१४/(१८१/२०१४)/एसएम-५, दिनांक २४ मार्च २०१५ अन्वये राज्यातील अनुदानित / विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळांना इ.५ वी व इ.८वी चे वर्ग जोडण्याबाबत आटीई अंतर्गत तदतूदीनुसार मुख्यकार्यकारी अधिकारी, यांचे शिफारशीने शासनास सादर करण्याचे निर्देश आहेत त्यानुसार सदरचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत आहे. सदर प्रस्तावावर कोणती कार्यवाही करावी याबाबत कृपया शासनाचे मार्गदर्शन व्हावे, ही विनंती.

आपला विश्वासु

(गोविंद नांदेडे)
शिक्षण संचालक,(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य पुणे-१

५०४ ati

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.१४४/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २६ मे, २०१७

**प्रस्तावना -**

१. खडकी शिक्षण संस्था, खडकी पुणे संचलीत चेतन दत्ताजी गायकवाड या इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ या ०१) अंतर्गत चेतन दत्ताजी गायकवाड या माध्यमिक ते उच्च माध्यमिक शाळेस (इ. ९ वी ते १२ वी, इंग्रजी माध्यम, राज्य मंडळ) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने नविन चलन व विहित रकमेची व मुदतीची मुदतठेव संस्थेच्या लगतच्या तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल, (१) एकर संस्थेच्या नावे ७/१२ चा उतारा अथवा (२)भाडेकरार नोंदणीकृत ३० वर्षाकरिता संस्थेच्या नावाने विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे तात्काळ सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.ग.गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत.

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे